महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक -२
रजि. ऑफीस ⇨" आदिवासी विकास भवन ", २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.
☎ दुरध्वनी ⇨ २५७५८९३,२५७१७८२,२५७६८६०, तार - ट्रायबलकॉर्प, फॅक्स⇨ (०२५३) २५७१५६०.
Web-www.mahatdc.com, mail-msctdcnsk@sancharnet.in

दिनांक :- ०६/०३/२०१०

# निविदा सुचना

आदिवासी विकास अंतर्गत म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळामार्फत अनुसूचित जमातीच्या शेती असलेल्या पात्र लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर मोफत तेलपंप / वीजपंप यांचे सिंचानासाठी महामंडळाच्या दहा (१०) प्रादेशिक व्यवस्थापकांच्या कार्यक्षेत्रात वाटप करण्यात येऊन महामंडळाच्या गोदामापासून ते लाभार्थींच्या शेतापर्यंत वाहतूक करुनत्या ठिकाणी तेलपंप / वीजपंप यांचे फिटींग करुन प्रत्यक्ष सिंचन उपलब्धता सुरु होण्यासाठी कार्यवाही करणेत येते व त्या कामासाठी वार्षिक स्वरुपात ठेका पध्दतीने जाहिर निविदा देऊन प्रशासकीय दृष्टया विकेंद्रीकरण करुन महाराष्ट्राच्या पश्चिम क्षेत्रातील नाशिक विभागात व महाराष्ट्राच्या पूर्व क्षेत्रात नागपूर विभागातील निविदेसोबत जोडलेल्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे वरील प्रयोजनासाठी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून त्यांना मंजूर केलेल्या तेलपंप महामंडळाच्या गोदामातून वाहतूक फिटींग व कार्यान्वित करणे इ. कामासाठी ठेकेदार संस्था व दर निश्चिती करण्याकरिता निविदा मागविण्यांत येत आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १. | निविदा फॉर्म किंमत रुपये | रुपये २०००/- |
| २. | निविदा फॉर्म विक्री कालावधी | दि. ११/०३/२०१० ते दि.३१.०३.२०१०,दुपारी १२ वाजेपर्यंत मु.का.नाशिक येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध. |
| ३. | निविदा फॉर्म स्विकृती | दि.३१.०३.२०१० पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत फार्म स्विकृत करण्यात येतील. |
| ४. | निविदा फॉर्म उघडणे | दि.३१.०३.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता |

सर्व इच्छूक अनुभवी ठेकेदारांनी निविदेसोबत जोडलेल्या तक्त्यातील तक्ता (अ) नाशिक विभागासाठी व तक्ता (ब) नागपुर विभागासाठी स्वतंत्र निविदा घेणे आवश्यक राहील. सदरच्या निविदा महामंडळाचे नाशिक येथिल मुख्य कार्यालयास वर निर्देशित केलेल्या कालावधीत कार्यालयीन कामाच्या दिवशी रुपये २०००/- मात्र (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) शुल्क (ना परतावा ) भरल्यास निविदा फॉर्मसह अटी शर्ती उपलब्ध होऊ शकतील. सक्षम आणि अनुभवी संस्था तांत्रिक संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

(टिप:- वरिल कार्यपध्दतीची कार्यप्रणाली पुढील संचालक मंडळाच्या बैठकीत कार्योत्तर मंजुरी घेणेत येईल.)

व्यवस्थापकीय संचालक
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या,
नाशिक.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक -२
रजि. ऑफीस ⇨ " आदिवासी विकास भवन ", २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.
☎ दुरध्वनी ⇨ २५७१७८२,२५७६८६०, तार - ट्रायबलकॉर्प, फॅक्स ⇨ (०२५३) २५७१५६०.
Web-www.mahatdc.com, mail-msctdcnsk@sancharnet.in

मुल्य रुपये २०००/-

## हंगाम २०१०-११ साठी तेलपंप वाहतुक कार्यान्वित करणे बाबत निविदेद्धारे संस्था निश्चित करणे

१. निविदा प्रपत्र क्रमांक :- ------------------------------------

२. कोणत्या संस्थेस / व्यक्तीस देण्यात आले :- ------------------------------------
------------------------------------

३. निविदा प्रपत्र दिल्याची तारीख :- / /२०१०

४. निविदा प्रपत्र महामंडळास सादर करण्याची अंतिम तारीख ३१/०३/१० :- / /२०१० (दुपारी १४.०० वाजेपर्यंत )

५. निविदा फॉर्म उघडणे :- दि. ३१/०३/२०१० दुपारी १५.०० वाजता

सदरचे निविदा प्रपत्रात एकूण ८ पृष्ठे आहेत

## निविदाव्दारा दर मागवून संस्था निश्चितीकरिता विहित केलेल्या अटी व शर्ती.

१. आदिवासी शेतकऱ्यांना महामंडळामार्फत ५ अश्वशक्ती क्षमतेचे तेलपंप अनुषंगिक उपसाहित्य दरवर्षी पुरवठा करण्यात येतो. महामंडळाचे गोदामापासून मंजूर आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत तेलपंपाची (पोर्टेबल) उपसाहित्यासह वाहतूक करुन लाभार्थीच्या शेतात पाण्याचे ठिकाणी बसवून व त्यात आवश्यक इंधन भरुन ते कार्यान्वित करणे, प्रात्यक्षिक दाखविणे, व महामंडळाचे नमुन्यात पोहोच दाखला सादर करणे इत्यादी कामाचेदर आणि संस्था निश्चित करावयाची आहे.

२. सदर निविदा प्रपत्राचे प्रत्येक पृष्ठांवर संबंधित संस्था / कंत्राटदार यांनी स्वाक्षरी करुन आपला सिल शिक्का नमूद करणे आवश्यक आहे.

अ) संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधींने निविदा प्रपत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.
ब) सहकारी संस्थेच्या बाबतीत ज्या पदाधिकाऱ्यास संस्थेने तसा ठराव करुन अधिकृत केले आहे, अशा व्यक्तीने निविदा प्रपत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

३. सदर कामाची निविदा सादर करणारी संस्था नोंदणीकृत संस्था असावी. त्याबाबतचे सक्षम अधिकारीचे प्रमाणपत्र सादर करावे.

४. अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असावा किंवा अशा प्रकारचे काम करण्याची क्षमता / पात्रता असल्याबाबत संस्थेने केलेल्या कामाची सक्षम अधिकारीचे प्रमाणपत्र सादर करावेत.

५. बयाणा रक्कमेपोटी विभाग अ व ब साठी रुपये २.५० लक्ष चा स्वतंत्र डी.डी.सादर करावा. (विभाग अ व ब चा तपशिल सोबत जोडला आहे.)

६. गत ३ वर्षाची उलाढालीबाबत सनदी लेखापाल किंवा लेखापरिक्षक किंवा सक्षम अधिकारी प्रमाणपत्र.

७. सदर निविदेनुसार राज्यातील सन २००९-१० या गत वर्षातील लक्षांक विचारात घेता विभाग "अ" व "ब" मधिल प्रत्येकी अंदाजे ४००० नग तेलपंप संच व उपसाहित्य वाहतूक करणे सह आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांचे शेतावर पाण्याचे ठिकाणी फिटींग करुन, प्रात्यक्षिक दाखवून कार्यान्वित करुन द्यावयाचे असून, निविदादाराने नमुद करावयाचे दरामध्ये सर्वप्रकारचे कर, आकार व सर्व्हीस चार्जेससह एकत्रित दर द्यावा लागेल. तेलपंपाचे सदरचे लक्षांकात वाढ किंवा घट होऊ शकेल.

८. निविदेत नमुद केलेले दर, निविदा उघडल्यापासून सुरवातील एक वर्षासाठी बंधनकारक राहतील. व पुढे सहा महिन्यांची मुदतवाढ व्यवस्थापकीय संचालक देऊ शकतील.

उपरोक्त अट क्रं. ३ ते ६ पर्यंत पुर्तता करणारे दस्तऐवज व महामंडळाचे निविदा फॉर्ममधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अटी शर्तीच्या फॉर्मवर स्वाक्षरीसह लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावे. लिफाफा क्र. २ मध्ये निविदा फॉर्म सोबत परिशिष्ट ब च्या नमुन्यातच स्वतंत्रपणे सादर करावे.

हे दोन्ही लिफाफे तिसऱ्या एका मोठया पाकीटात बंद करुन सादर करावे, त्यावर तेलपंप वाहतूक व कार्यान्वित करणे बाबत निविदा तसेच निविदाधारकाचे नांव व पत्ता, दुरध्वनी इ. मजकुर स्पष्ट करण्यात यावा.

निविदा उघडतेवेळी एका पाकीटातील लिफाफा क्र. १ मधील आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली आहे किंवा नाही, याची खातरजमा करण्यात येईल अशी पूर्तता केली नसल्याचे आढळल्यास त्या पाकीटातुन प्राप्त झालेल्या लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही व अशी निविदा रद्द करण्यात येईल.

निविदाधारकाने लिफाफा क्रमांक २ मध्ये परिशिष्ट ब नुसार दरपत्रक स्वतंत्रपणे सादर करावे.

अपूर्ण किंवा सशर्त तसेच अटींची पूर्तता न केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

इच्छुक अनुभवी ठेकेदारांनी निविदेसोबत जोडलेल्या तक्त्यातील तक्ता (अ) नाशिक विभागासाठी व तक्ता (ब) नागपूर विभागासाठी स्वतंत्र निविदा भरणो आवश्यक आहे.

ज्या निविदाधारकांची निविदा नामंजूर करण्यात आली असेल त्यांची सुरक्षा रक्कम अंतिम निर्णयानंतर परत करण्यात येईल.

## निविदा स्विकृतीनंतर पूर्ण करावयाच्या अटी व शर्ती

९. ठेकेदारांनी तेलपंपाची महामंडळाच्या गोदामापासून वाहतूक, चढ-उतार हमालीसह, तेलपंप लाभार्थ्याचे शेतावर पाण्याचे ठिकाणी बसविणे व इंधन भरुन सुरु करणे इत्यादी कामासाठी संबंधित संस्थेस महामंडळाबरोबर करारनामा करावा लागेल. त्याबाबतचा खर्च संस्थेस करावा लागेल.

१०. अशाप्रकारे करारनामा स्वाक्षरी झाल्यानंतर सदर संस्थेस / व्यक्तीस १० दिवसांच्या आत एकूण खर्चाच्या ५% इतकी रक्कम सुरक्षा अनामतीपोटी महामंडळाकडे बँक गॅरंटी अथवा डिमांडड्रॉफ्टव्दारे जमा करावी लागेल.

११. वरील प्रकारे महामंडळाशी करारनामा केलेल्या संस्थेस त्यांनी पूर्ण करावयाच्या कामासंदर्भात महामंडळाचे मुख्य कार्यालय / प्रादेशिक कार्यालय यांचेकडून वेळोवेळी वाहतूक आराखडा निर्गमित करण्यात येईल. असा वाहतूक आराखडा निर्गमित केलेल्या तारखेपासून ४५ दिवसात सोपविलेले काम पूर्ण करावे लागेल.

१२. सोपविलेले काम दिलेल्या मुदतीत पूर्ण न झाल्यास खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | ७ दिवसांचा विलंब झाल्यास दंड प्रतिदिन प्रतिपंप | रुपये ५०/- |
| ब) | ७ दिवस ते १५ दिवसांपर्यंत विलंब झाल्यास प्रतिदिन प्रतिपंप | रुपये १००/- |
| क) | १५ दिवस ते ३० दिवसांपर्यंत विलंब झाल्यास प्रतिदिन प्रतिपंप | रुपये २००/- |
| ड) | ३० दिवसांपुढील दिवसांसाठी प्रतिदिन प्रतिपंप सरसकट | रुपये २५०/- |

१३. काम सोपविलेल्या संबंधित संस्थेने / व्यक्तीने त्यांचे कामाचे खात्रीबाबत १ वर्ष मुदतीची लेखी वॉरंटी (हमी) द्यावी लागेल.

१४. कंत्राटदार / संस्था यांनी केलेल्या कामाची तपासणी महामंडळाचे प्रतिनिधी यांचेकडून करण्यात येईल. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे कंत्राटदाराने महामंडळास वाहन उपलब्ध करुन द्यावे लागेल.

१५. संबंधित संस्था / कंत्राटदार यांना दिलेल्या मुदतीत व मंजूर दरात सोपविलेले काम पूर्ण करावे लागेल. दरवाढीबाबतची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

१६. महाराष्ट्र राज्यातील महामंडळाचे १० प्रादेशिक कार्यालये व त्यांना जोडलेल्या संबंधित असलेल्या एकूण २४ प्रकल्प (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) कार्यालयांचे कार्यक्षेत्रातील विभागनिहाय तक्ता (अ) नाशिक विभाग व तक्ता (ब) नागपूर विभाग या परिक्षेत्रातील दर्शविल्याप्रमाणे सर्व पात्र आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंप व त्याच्या उपसाहित्यांची प्रादेशिक कार्यालयांचे अधिनस्त मध्यवर्ती गोदामातून वाहतूक आराखडयानुसार वाहतूक करावयाची आहे. त्यासाठी संबंधित व्यक्ती, कंत्राटदार / संस्थेकडे पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ व वाहतूक यंत्रणा असणे आवश्यक आहे. व्यक्ती / कंत्राटदाराने प्रत्येक प्रादेशिक विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा नियुक्त करणे आवश्यक आहे. व स्वतंत्र नियुक्त यंत्रणेच्या कर्मचारी / प्रतिनिधी बाबत क्षेत्रिय कार्यालयास नाव पत्ता दुरध्वनी व तेलपंप वाहतूकीसाठी असलेल्या वाहनाचे रजिष्टर ई. बाबत माहिती द्यावी लागेल. जेणेकरुन पंप पुरवठा व कार्यान्वित करणेकामी गतीरोध निर्माण न होता सदरचे काम संपूर्ण राज्यात जलदगतीने व एकाचवेळी करता येईल. संस्थेने त्यांच्याकडे उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व अनुषंगिक बाबींची माहिती निविदेसोबत सादर करावी.

१७. तेलपंपाचे लाभार्थी तक्ता (अ) नाशिक विभाग महामंडळाच्या नाशिक, जव्हार (ठाणे), जुन्नर (पुणे), नंदूरबार, व तक्ता (ब) नागपूर विभाग- धारणी (अमरावती), यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, अहेरी आणि गडचिरोली प्रादेशिक कार्यालयांचे कार्यक्षेत्रातील असतील. या क्षेत्रांतील महामंडळाचे तेलपंप साठवणुक केलेल्या गोदामापासून तेलपंपाची वाहतूक करुन ती लाभार्थ्यांच्या शेतापर्यंत पोहच करुन, पाण्याचे ठिकाणी बसवून त्यात आवश्यक इंधन भरुन तेलपंप सुरु करुन देण्यापर्यंतच्या कामाचे दर द्यावे लागतील.

१८. निविदेत भरणा करावयाचे दर विभाग निहाय अंदाजे दर्शविलेल्या (अंदाजे ४००० नग तेलपंप) द्यावे लागतील. अंशत: तेलपंप संच वाहतूक व पोहोच दर भरता येणार नाही. अपूर्ण अथवा अटीयुक्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.

१९. कोणतीही निविदा नाकारण्याचा किंवा अंशत: स्विकारण्याच्या अथवा एखादी निविदा पूर्णत: स्विकारण्याच्या किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी राखून ठेवला आहे.

२०. महामंडळाने मान्य केलेल्या दरानुसार निविदादारास संबंधित काम पूर्ण करुन देणे बंधनकारक राहील. तसेच निविदादारास काम सोपविल्यानंतर कोणत्याही प्रकारचा अग्रिम दिला जाणार नाही.

२१. डिझेल इंजिनसाठी लागणारे डिझेल ऑईल अधिकृत कंपनीचे उत्पादीत (ब्रॅण्डेड) असावे.

२२. **अदायगी** - अ) महामंडळाने विहित केलेल्या लाभार्थी पोहोच प्रमाणपत्रावर संबंधित लाभार्थी, गांवातील २ सुशिक्षित साक्षीदार, व संबंधित विजतंत्री, व जोडणी करणारा प्रतिनिधी यांची स्वाक्षरी आवश्यक राहील.

ब) महामंडळाने विहीत केलेल्या वाटप प्रमाणपत्रावर जोडणी करणारा ठेकेदार, वीजतंत्री, उप प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, व प्रकल्प कार्यालय प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरी होऊन ते देयकासोबत सादर झाल्यानंतर ९०% अदायगी देण्यात येईल. उर्वरित १०% अदायगी ९०% देयकाच्या अदायगीचे तारखेपासून ९० दिवसांनी करण्यात येईल.

२३. ज्या निविदादाराची निविदा दर स्विकारण्यांत येतील त्यास रुपये १०००/- इतके विहित शुल्क भरणा करुन महामंडळाचे नाममात्र सभासद व्हावे लागेल.

२४. निविदाधारकाने सर्व अटी शर्तीचे पुर्ततेसह तक्ता (अ) नाशिक विभाग व तक्ता (ब) नागपूर विभाग यासाठी स्वतंत्ररित्या निविदा सादर करावी.

२५. कांही वादविवाद उद्‌भवल्यास ते नासिक येथील दिवाणी न्यायालयाचे अधिकार कक्षेत येतील.

करावयाच्या कामकाजाचा तपशिल परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आला असून, निविदेत भरणा करावयाचे दर परिशिष्ट 'ब' मध्ये भरणा करुन सादर करण्यात यावेत.

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या,
नाशिक-२

---

## **प्रमाणपत्र**

वर नमुद केलेल्या अनुक्रमांक ०१ ते २४ मध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून, त्या सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

निविदादाराची स्वाक्षरी
सही व शिक्का

स्थळ :-
दिनांक :-

## निविदा प्रपत्र परिशिष्ट 'अ'

वाहतूकीसह जोडणी करुन व इंधन भरुन सुरु करुन, प्रात्यक्षिक करुन द्यावयाच्या साहित्याचा तपशिल.

| अ.नं. | तपशिल | नग |
|---|---|---|
| १. | ५ अश्वशक्ती १५०० आरपीएम वॉटरकूल्ड २२०० आरपीएम वॉटरकूल्ड डिझेल इंजिन पंपसेट. | १ संच |
| २. | सेक्शन फ्लेक्झिबल पीव्हीसी ८० एम.एम. (३ इंच) डबलवॉल कोरुगेटेड ग्रीन पाईप प्रत्येकी २५ फुट. | १ संच |
| ३. | डिलीव्हरी फ्लेक्झिबल पीव्हीसी ६५ एम.एम.ग्रीन डबलवॉल कोरुगेटेड प्रत्येकी २५ फुट. | १ संच |
| ४. | १ ग्रीन पाईप प्रत्येकी ३ मीटर. | १ संच |
| ५. | फूटव्हॉल्व पीव्हीसी ८० एम.एम.साईज. | १ संच |
| ६. | बेंड जी.आय.६५ एम.एम.साईज. | १ संच |
| ७. | निपल्स प्रत्येकी ४ नग | १ संच |
| ८. | क्लिप्स प्रत्येकी ३ नग | १ संच |
| ९. | हबक टीन | १ संच |
| १०. | स्पॅनर सेट | १ संच |
| ११. | इंधन प्रति इंजिन डिझेल प्रति पंप २ लिटर<br>इंजिन ऑईल प्रति संच १.५०लिटर | प्रति संच |

टिप - वरीलप्रमाणे एकूण विविध ११ साहित्यांचा समावेश असलेला एक संच याप्रमाणे अंदाजे एकूण --------- संच लाभार्थ्याचे शेतापर्यंत वाहतूक करावयाचेअसून पंपामध्ये आवश्यक इंधन भरुन तो सुरु करुन द्यावयाचा आहे.

# निविदा प्रपत्र परिशिष्ट ब

## कामाचा तपशिल

| अ.नं. | विवरण | एकत्रित प्रतिपंप (सर्व करांसहित रुपये) |
|---|---|---|
| १. | ५ अश्वशक्ती क्षमतेचा डिझेल इंजिन पंपसेट (१५०० ते २२०० आरपीएम ) सह डिलीव्हरी पाईप, सक्सन पाईप व इतर साहित्यासह सन २०१०-११ करीता प्रत्येकी विभागाची अंदाजे ४००० संचाची महामंडळाचे नाशिक विभाग- ४००० नग प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जव्हार, जुन्नर, नंदूरबार, व नागपूर विभाग- ४००० नग धारणी, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, अहेरी आणि गडचिरोली अंतर्गत महाराष्ट्रात कोणत्याही गोदामातून तेलपंपाची संबंधीत आदिवासी शेतकऱ्यांचे शेतापर्यंत उपसाहित्यासह चढ-उतार हमालीसह वाहतुक करणे जोडणी करणे व आवश्यक इंधन प्रतिपंप २ लिटर डिझेल आणि १.५ लिटर इंजिन ऑईल भरुन पाण्याचे ठिकाणी बसवून कार्यान्वित करुन देणे तसेच प्रात्यक्षिक करुन दाखविणे. | |
| | **सर्व करांसह प्रति तेलपंप एकूण दर-** | |

पंपासाठी दर (अक्षरी रुपये -------------------------------------------------------)

निविदादाराची स्वाक्षरी
सही व शिक्का

स्थळ :-
दिनांक :-

## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,नासिक

### तक्ता- (अ)    नासिक विभाग

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | प्रादेशिक कार्यालयांतील येणारे जिल्हे |
|---|---|---|
| १) | नासिक | नासिक |
| २) | जव्हार | ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग. |
| ३) | जुन्नर | अहमदनगर, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा. |
| ४) | नंदूरबार | नंदूरबार, धुळे, जळगांव, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद. |

### तक्ता- (ब)    नागपूर विभाग

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | प्रादेशिक कार्यालयांतील येणारे जिल्हे |
|---|---|---|
| १) | भंडारा | नागपूर, भंडारा, वर्धा. |
| २) | यवतमाळ | यवतमाळ, वाशिम, अकोला, नांदेड, हिंगोली, परभणी, बुलढाणा. |
| ३) | धारणी | अमरावती |
| ४) | चंद्रपूर | चंद्रपूर |
| ५) | गडचिरोली | गडचिरोली |
| ६) | अहेरी | गडचिरोली |

--------- xxx ----------